# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २०/१०/२०२४ (रविवार) सकाळ**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दि. १९/१०/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदार व्दारे माहीती मिळाली कि, छिंदवाडा रोडकडुन केळवद मार्गे नागपूर येथे पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. अशी माहीती मिळाल्याने स्टाफ यांनी छिंदवाडा रोडकडुन केळवद मार्गे नागपूर येथे नाकाबंदी केली असता एका पांढऱ्या रंगाची कार क्र. एम.एच–०४/ई एच–२८५४ ही येताना दिसल्याने सदर वाहनास स्टाफच्या मदतीने थांबण्याचा ईशारा केला असता वाहन चालकाने आपली कार रोडच्या कडेला थांबवली असता सदर वाहन चालक यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **राकेश अशोक आतराम वय ३६ वर्ष रा रामेश्वरी रोड पार्वती नगर गल्ली नं २ जीवन शाळेसमोर नागपूर** असे सांगीतले त्यास सदर वाहनामध्ये मागे काय आहे याबाबत विचारपुस केली असता वाहन चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंगाखु मिळून आला तो खालिलप्रमाणे १) सुगंधीत तंबाखु जनम ५३५,१६८ नग ,एक नग ५०० ग्रॅम नग कि २५० रू किमत ४२,००० रू , २) सुगंधीत तंबाखु रिमझिम ब्रॅन्ड १२० नग ,एक नग ५०० ग्रॅम नग कि ५५० रू किमत ६६,००० रू , ३) सुगंधीत तंबाखु १४० नग कि १९५ रू २७,३०० रू, ४) सुगंधीत तंबाखु, ४० नग कि १५० रू किमती ६००० रू ५) सुगंधीत तंबाखु,५०० ग्रॅम वजनाचे ६० नग कि २५० रू किमती १५००० रू , ६) पान मसाला , पान पराग ११२.५० ग्रॅम १०० पाकीट प्रती पॉकीट २५० रू किंमत २२५०० रू असा एकुन वजन २८१.५किलो किंमत १,७८,८०० रू चा माल ७) पांढ–या रंगाची कार क्रमाक, एम एच ४० ई एच २८५४ अंदाजे किंमत ४,००,०००रू चा एकुन किंमत ५,७८,८०० रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री हर्ष पोद्दार, मा. अप्पर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उप विभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर श्री. अनिल मस्के यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि अनिल राउत ठाणेदार पो.स्टे केळवद पोहवा दिनेश काकडे, पोहवा मंगेश धारपुरे, पोशि गणेश उईके, पो.शि विजय क्षिरसागर, पो. स्टे केळवद यांनी केली आहे.




## सावनेर परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकून देहव्यापार करणाऱ्या पिडीत महिलेची सुटका करून आरोपीतांना केले अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील विश्रांती लॉज नागमंदिर जवळ सावनेर येथे मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास आणुन वेश्याव्यवसाय सुरु असल्याबाबत गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाल्याने दिनांक १९/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टॉफ सह विश्रांती लॉज येथे जाऊन रेड केली असता विश्रांती लॉज चालक मालक **आरोपी नामे—१) रुपेश उर्फ गोलू राधेशाम छिपा रुषिया २) आकाश मोतीलाल खोब्रागडे ३) यश व्यवहारे, अनोळखी — ३ इसम** यांनी संगनमत करून पिडीत महिलेस पैशाचे आमीष दाखवुन वेश्याव्यवसाय करण्यास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी विश्रांती लॉज सावनेर येथे बोलावून विश्रांती लॉज मधील रुम कुंटणखाना म्हणून वापरण्यास हेतुपुरस्सर परवानगी देवुन पिडीत महिलांना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. आरोपीतांविरुध्द कलम १४३ (१)(एफ), ३(५) बी.एन.एस, ३(२)(ए), ५(१)(क), ५(१)(ग), ५(१)(घ), ६(१)(ख), ७(१)(बी) स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधा अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी क्र. १) व २) यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अप्पर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. अनिल मस्के, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी सा. सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सपोनि मंगला मोकासे, पोउपनि दीपक निंबाळक, पोहवा सुरेंद्र वासनिक, सुभाष रूडे, सुनिल तलमले, पोअं. अंकुश मुळे, मपोशि हेमलता, जोत्सना यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर